शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न पारंपारिक महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणा-या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील उपस्थितीमध्ये सुट देण्याबाबत डॉ. धनराज माने शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१ यांचे क्र. उशिसं/मवि-१/सांस्कृ.कार्य.उपस्थिती-सुट/२०१८/१७९३३ दिनांक. २०/१०/२०१८ यांचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 163

दि. 25 OCT 2018

d:\mangutkar\circular.docx

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

**Web :** www.dhepune.gov.in **E-Mail :** mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३.

क्र.: उशिसं/मवि-१/सांस्कृ.कार्य.उपस्थिती-सूट/२०१८/ 17933 दि. .१०.२०१८ 20 OCT 2018

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय: सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणा-या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील उपस्थितीमध्ये सूट देण्याबाबत..**

संदर्भ: १. शासनपत्र क्र.: सकीर्ण २०१८/प्र.क्र.३०४/विशि-३ दि. १५.१०.२०१८

विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी लोकसत्ता एकांकिका स्पर्धा, पुरुषोत्तम करंडक, आयएनटी सवाई एकांकिका स्पर्धा व विद्यापीठ किंवा आंतर विद्यापीठीय महोत्सव व नावाजलेल्या स्पर्धांमध्ये सहभागी होत असतात.

अशा सहभागी विद्यार्थ्यांना तालीम तसेच एकांकिका स्पर्धात सहभाग नोंदविताना, त्यांच्या उपस्थितीवर परिणाम होऊ नये म्हणून, महाविद्यालयीन उपस्थितीमध्ये सवलत देण्याबाबत वेळोवेळी विद्यार्थ्यांकडून मागणी होत आहे.

सदर बाब विचारात घेऊन ज्या प्रमाणे विद्यापीठात वैद्यकीय कारणात्सव प्रचलित नियमानूसार विद्यार्थ्यांना सूट देण्यात येते. तशी ७५% उपस्थितीत सूट देण्याबाबत विद्यापीठांच्या अधिष्ठाता यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर सूट देताना मान्यताप्राप्त महोत्सव/एकांकिका यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांनाच याचा लाभ घेता येईल याची दक्षता विद्यापीठाने घ्यावी. तसेच सदर एकांकिकांच्या तालमीसाठी सहभागी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील एक कक्ष ही विनाशुल्क उपलब्ध करुन देण्याबाबत आपले स्तरावरुन सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

उपरोक्त सुविधांमुळे सांस्कृतिक कार्यक्रमा मध्ये सहभागी होणा-या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रत माहितीस्तव -

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
२. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.